राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

'' (सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६)द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)''

(विद्या विभाग)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी क्रमांक: कार्यालय: ०७१२–२५३२०६३ फॅक्स : ०७१२–२५५५७०१

क्र. रातुमनावि/विद्या/१७/ ३१८ दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७

# : अधिसूचना :

सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अंतर्गत विद्यापीठात राबविण्यात येणाऱ्या चारही विद्याशाखेतील परिक्षेच्या कामात एकसुत्रता राहण्याकरिता निर्देश क्रमांक १३/२०१७ निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर निर्देशान्वये आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखे अंतर्गत येणाऱ्या M.S.W. व M.Lib.I.Sc भाग १ व २ (1 to 4 semester) पदव्युत्तर अभ्यासक्रमातील निवड आधारित श्रेयांक पध्दतीकरिता(CBCS) विद्यापीठाच्या प्रारूप निदेश समितीने दिनांक ०८/११/२०१७ रोजी प्रारूप निदेश तयार करून दिले असून पुढील कार्यवाहीस्तव शिफारशीत केले होते. त्याअनुषंगाणे मा.कुलगुरू महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १२(७) अंतर्गत संबधीत अभ्यासमंडळ, आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा, विद्वत परिषद व व्यवस्थापन परिषदेच्या वतिने मान्यता प्रदान केलेली आहे.

उपरोक्त मान्यतेनुसार Master of Library and Information Science (M.Lib.I.Sc) या पदव्युत्तर अभ्यासक्रमातील निवड आधारित श्रेयांक (CBCS) पध्दतीकरिता **निदेश क्रमांक ३२/२०१७ व** Master of Social Work (M.S.W.) या पदव्युत्तर अभ्यासक्रमातील निवड आधारित श्रेयांक (CBCS) पध्दतीकरिता **निदेश क्रमांक ३३/२०१७ सत्र २०१७–२०१८ पासुन पुढे लागू करण्यात येत आहे**. सदर निदेशास मा. कुलगुरू महोदयांनी कार्यान्वीत करण्याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १२(८) अंतर्गत दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी विद्वत परिषद व व्यवस्थापन परिषदेच्या वतिने मान्यता प्रदान केलेली आहे. करिता हे दोन्ही निर्देश निर्गमित करण्यात येत असून या प्रमाणे सबंधीतांनी कार्यवाही घ्यावी ही विनंती.

(टिप:– उपरोक्त निदेश विद्यापीठाच्या **www.nagpuruniversity.org** या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.)

मा.कुलगुरूंच्या आदेशानुसार

(पुरणचंद्र मेश्राम)

कुलसचिव